**महाराष्ट्र शासन**
सामान्य प्रशासन विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय (विस्तार), मंत्रालय,मुंबई ४०० ०३२.

दूरध्वनी क्रमांक : ०२२-२२७९४०१३ /०२२-२२७९३३५५ Email ID : avindra.morye@nic.in

क्रमांक : संकीर्ण २०२१/प्र.क्र.१७/१६-ब (सी) दिनांक :- २५ जानेवारी, २०२१.

प्रति,

कुलसचिव,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, (पूर्वीचे पुणे विद्यापीठ),
गणेशखिंड, पुणे -४११ ००७.

विषय : मराठा प्रवर्गातील उमेदवाराच्या ईडब्ल्युएस प्रवर्गामध्ये असलेल्या प्रमाणपत्राबाबत.
संदर्भ : आपले पत्र क्र.आरक्षण/पी-५२/५३९, दिनांक १७.११.२०२०.

संदर्भाधिन पत्राच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे मार्गदर्शन करण्यात येत आहे.

शासन निर्णय दिनांक २३.१२.२०२० नुसार मा.सर्वोच्च न्यायालयाच्या दिनांक ०९.०९.२०२० रोजीच्या अंतरिम स्थगिती आदेश विचारात घेता, सद्य:स्थितीत सामाजिक व शैक्षणिकदृट्या मागास (एसईबीसी) वर्गातील उमेदवारांना सन २०२०-२१ या वर्षातील शैक्षणिक प्रवेश घेण्यासाठी व सरळसेवा भरतीकरीता आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांचे (ईडब्ल्युएस) प्रमाणपत्र देण्यास मान्यता देण्यात आली आहे. तसेच सदर शासन निर्णयातील अ.क्र. (५) येथे नमुद केल्यानुसार सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागासप्रवर्गातील उमेदवारांना खुल्या प्रवर्गात अथवा ईडब्ल्यूएस आरक्षणातून लाभ घेणे ऐच्छिक असेल व (६) येथे नमुद केल्यानुसार उमेदवाराने शैक्षणिक प्रवेशातील अथवा शासन सेवेत भरतीकरीत ईडब्ल्यूएस आरक्षणाचा लाभ घेतल्यास सदर उमेदवार एसईबीसी आरक्षणाच्या लाभास पात्र ठरणार नाही व (७) येथे नमुद केल्यानुसार सदरचे आदेश हे मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेली विशेष अनुज्ञा याचिका क्र.१५७३७/२०१९ व इतर याचिकांमधील अंतरीम आदेशावरील निर्णयाच्या अथवा अंतिम निर्णयाच्या अधीन राहतील.

उपरोक्त परिच्छेदमध्ये नमुद सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय क्रमांक राआधो ४०१९/प्र.क्र.३१/ १६-अ, दिनांक २३.१२.२०२० नुसार श्रीमती प्रगती जाधव यांनी दिनांक १२.०९.२०२० रोजी सादर केलेले आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांचे (ईडब्ल्युएस) प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यास हरकत नाही.

आपला,

( अ.भि.मोरये )
कार्यासन अधिकारी.